उद्‌भवाचे अंतर मुख्य साठवण टाकीपासून ३ कि.मी. पेक्षा जास्त होत असेल, किंवा १०० मीटरपेक्षा जास्त उंचीवर पाणी न्यावे लागणार आहे, अशा योजनांमधील पाईप लाईन, ब्रेक प्रेशर टँक, पंपिंग मशिनरी इत्यादी कामांसाठी येणा-या खर्चावर लोकवर्गणी माफ करण्यासाठी शासन स्तरावर समिती गठित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन निर्णय क्रमांक ग्रापायो-१२०८/प्र.क्र.९६/पापु-०७**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक १८ ऑगस्ट, २००८**

**वाचा:** शासन परिपत्रक, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापापु -१००३/प्र.क.७५/पापु-०७, दिनांक १ जुलै, २००३

**प्रस्तावना**:

राज्यातील ज्या गावांच्या /वाड्यांच्या जवळपास पिण्याच्या पाण्याचा खात्रीचा स्रोत (पाणी गुणवत्ता बाधित असल्यामुळे अथवा इतर कोणत्याही कारणास्तव) उपलब्ध नसल्याने त्या गावांना /वाड्यांना दुरून पाणी आणावे लागणार असेल तर अशा गावाच्या / वाडीच्या योजनेच्या भांडवली खर्चाचा लाभार्थ्यांनी भरावयाच्या लोकसहभाग निर्धारित करण्याची कार्यवाही संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली आहे. मात्र या शासन निर्णयानुसार लोकवर्गणीची रक्कम काढताना ठरविण्यात आलेली दरडोई खर्चाची मर्यादा ही खुपच जास्त असल्याने अनेक योजनांना या शासन निर्णयामुळे लोकवर्गणीमधील सुटीचा लाभ होत नाही.

२. उपरोक्त परिस्थिती विचारात घेऊन, संदर्भाधीन शासन निर्णय अधिक्रमीत करून, पाणी गुणवत्ता बाधित गावे /वाड्या तसेच अन्य गावे / वाड्या जेथे नव्याने पाणी पुरवठा योजनेची आखणी करताना, जवळपास पिण्याच्या पाण्याचे सुरक्षित व खात्रीचे उद्‌भव उपलब्ध न झाल्याने त्यांना ३ किलोमीटर व त्यापेक्षा जास्त अंतरावरील उद्‌भव निवडावे लागतात किंवा विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीमुळे ज्या योजनांसाठी १०० मीटर पेक्षा जास्त उंचीवर पाणी उचलावे लागणार असेल, अशा योजनांच्या बाबतीत संबंधित गावे / वाड्यांवरील लोकवर्गणीचा भार कमी करण्यासाठी त्यांना योजनेची उद्‌भवापासून साठवण टाकीपर्यंतची पाईपलाईन, ब्रेक प्रेशर टँक, पंपीग मशिनरी इ.वरील खर्चावरील लोकवर्गणी माफ करण्यासाठी विहित कार्यपद्धती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून संदर्भाधीन शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येवून, पाणी गुणवत्ती बाधित गावे /वाड्या तसेच अन्य गावे / वाड्या जेथे नव्याने पाणी पुरवठा योजनेची

आखणी करताना, जवळपास पिण्याच्या पाण्याचे सुरक्षित व खात्रीचे उद्‌भव उपलब्ध न झाल्याने त्यांना ३ किलोमीटर व त्यापेक्षा जास्त अंतरावरील उद्‌भव निवडावे लागतात किंवा विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीमुळे ज्या योजनांसाठी १०० मीटर पेक्षा जास्त उंचीवर पाणी उचलावे लागणार असेल, अशा योजनांच्या बाबतीत संबंधित गावे / वाड्यांवरील लोकवर्गणीचा भार कमी करण्यासाठी त्यांना योजनेची उद्‌भवापासून साठवण टाकीपर्यंतची पाईपलाईन, ब्रेक प्रेशर टॅंक, पंपीग मशिनरी इ.वरील खर्चावरील लोकवर्गणी माफ करण्यासाठी शासन स्तरावर पुढीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे :

| | |
|---|---|
| प्रधान सचिव | अध्यक्ष |
| सह सचिव (पापु-०७) | सदस्य |
| संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे | सदस्य |
| सदस्य सचिव (तां.), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी | सदस्य |
| कक्ष अधिकारी (पापु-०७) | सदस्य सचिव |

२. या समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहीलः

(१) समिती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करून, त्यांची व्यवहार्यता तपासेल.

(२) सुचविण्यात आलेला पर्याय हाच कमी खर्चाचा पर्याय आहे, याबाबतची खातरजमा करील.

(३) प्रस्ताव व्यवहार्य असल्यास, त्यानुसार समिती आपली सहमती जिल्हा परिषदेस कळवेल.

३. समितीपुढे योजनांचे प्रस्ताव सादर करताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालील प्रमाणे खातरजमा करणे आवश्यक आहे.

- प्रस्तावित योजनेसाठी गावाच्या जवळपास किमान अंतरावर कोणताही खात्रीशीर उद्‌भव उपलब्ध नाही याबाबतचे संबंधित भूवैज्ञानिक यांचे प्रमाण पत्र.
- गावामधील पिण्याच्या पाण्याचे स्रोत ५० टक्केपेक्षा जास्त बाधित आहेत
- सध्या या योजनेतील गावांमध्ये अस्तित्वात असलेल्या पाणी पुरवठा उपाययोजनांकरिता ग्रामपंचायती आवश्यक त्या प्रमाणात पाणी पट्टी आकारित आहेत व वसूली होत आहे व प्रस्तावित योजना कार्यान्वित झाल्यावर या योजनेची येणारी पाणीपट्टी भरण्यास तयार असल्याबाबतचा संबंधित ग्रामपचायतींचा ठराव.
- लोकवर्गणी भरण्यापासून सूट ही फक्त पाईप लाईन, ब्रेक प्रेशर टॅंक, पंपिंग मशिनरी इत्यादी करिता आहे.
- गावातील साठवण टाकी व वितरण व्यवस्था इत्यादी खर्चाच्या १० टक्के इतकी लोकवर्गणी भरण्यास संबंधित ग्रामपंचायत तयार आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०८१८१३०११८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,



**(डॉ. राजन खोब्रागडे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७